## ॥ श्री ॥
## ॥ बाबा ॥

# काकडा

मंदिरी सारे जमूनी आम्ही काकडा लाविला
चैतन्याचा प्रकाश आता । सर्वांवर पडला ॥धृ.॥

बाबांवरच्या श्रद्धेने । हा काकडा वळला ।
प्रचितीच्या सहाणे वरती तो घट्ट मळला ।
गणूदेवाच्या कृपेने मग तूप मिळाले
षडरिपूंना अग्नी देवूनी तो मग भिजविला ॥1॥

मोह मायेच्या चक्रव्यूहामध्ये आम्ही सापडलो
व्रत उपास-तापासाने आम्ही जखडलो
श्रीरंगाच्या चरणी येऊनी मूक्तची हो झालो
अमृतवर्षावाने आम्ही धन्यची हो झालो ॥2॥

चारी मुक्ती चार धाम तुमच्याच चरणी
वैकुंठीचा आनंद आम्हा मिळतो क्षणोक्षणी
ॠणानुबंध जुळले आमुचे क्षेत्री वांगणी
भक्तगण जमूनी सारे घेती लोटांगणी ॥3॥

★★★★★